# <u>हस्तपुस्तिका क्र.०१</u>

## प्रस्तावना, संस्था, संस्थेची कार्य व कर्तव्ये यांचा तपशील

**<u>प्रस्तावना:-</u>**

प्रमुख अधिकारी (चौकशी) या खात्याची निर्मिती कशी झाली हे कळल्यास एखाद्यास मौज वाटेल. मे,1922 पूर्वी कामाची ठिकाणे, हजेरी चौक्या अथवा भांडारे ह्या ठिकाणची प्रत्यक्ष स्थिती, कामकाज पध्दती व त्यांच्या संबंधित अभिलेखांतील अथवा पुस्तकांतील नोंदी पडताळून त्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता महानगरपालिकेकडे नाव घेण्यासारखी यंत्रणा नव्हती. तोपर्यंत, प्रमुख लेखापालांचे कार्यालय, सर्वसाधारण (नित्य) लेखा परीक्षा आणि आर्थिक बाबी हाताळत असे. तथापि, सन 1910-11 च्या दरम्यान, प्रमुख लेखापाल खात्यातील अधिकाऱ्यांपैकी एक, श्री.डब्ल्यु. इ. वैते ह्यांच्या अनन्यसाधारण उपक्रमशीलतेमुळे, प्रमुख लेखापाल कार्यालयाचा एक अंतर्गत भाग म्हणून चाचणी लेखा परीक्षा खात्याची निर्मिती झाली. तथापि, मे,1922 पर्यंत त्यांना महसूल आणि इतर लेखा परीक्षेचे काम करण्यासाठी सांगितले असल्यामुळे ते बाह्य लेखा परीक्षा व स्थळ परीक्षा पूर्णांशाने करीत नव्हते. तरीही श्री.डब्ल्यु. इ. वैते यांनी काही वेळ खर्च करून, केलेल्या बाह्य लेखा परीक्षांत फसवणुकीच्या मार्गाने सार्वजनिक पैशाच्या अपहाराची काही प्रकरणे उघडकीस आणली. श्री.एच. बी. क्लेटॉन, तत्कालीन महानगरपालिका आयुक्त ह्यांनी अनेक प्रसंगी महानगरपालिका प्रशासनाच्या विविध शाखांमध्ये प्रतिनिधींमार्फत स्वतंत्र चौकशी सुरू करण्याचा प्रयत्न केला. तथापि अशा प्रयत्नांचे परिणाम उत्साहवर्धक नव्हते. त्यावेळी चाचणी लेखा परीक्षा करण्यासाठी पुरेशा दर्जाचा स्वतंत्र अधिकारी असण्याची आवश्यकता भासू लागली. महानगरपालिकेच्या विविध खात्यांची चाचणी लेखा परीक्षा करण्याकरिता, महानगरपालिकेने तिच्या दिनांक 01.05.1922 च्या ठराव क्र.972 अन्वये, चाचणी लेखा परीक्षा अधिकाऱ्याचे एक पद निर्माण केले आणि महानगरपालिका आयुक्तांशी सल्लामसलत करून चाचणी लेखा परीक्षा अधिकारी ह्या पदाकरिता अर्जांचा विचार करण्याकरिता 16 नगरसेवकांचा समावेश असलेली समिती नियुक्त केली.

श्री.बी. के. वागळे ह्यांची चाचणी लेखा परीक्षा अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. नियमित तसेच स्थळ लेखा परीक्षा करण्यास अथवा विशिष्ट चौकशीचे त्यांना आदेश केवळ महापालिका आयुक्त देऊ शकत होते. ह्याकरिता लागणाऱ्या कागदपत्रांची, प्रमुख लेखापाल ह्यांच्या कार्यालयातील सहज उपलब्धता ध्यानात घेऊन त्यांचे पद प्रमुख लेखापाल खात्याच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आले. चाचणी लेखा परीक्षा अधिकाऱ्यांच्या सूचनेवरून सन 1936-37 च्या दरम्यान महानगरपालिका मुद्रणालय अस्तित्वात आले आणि ते सन 1951-52 पर्यंत त्यांच्या नियंत्रण व पर्यवेक्षणाखाली ठेवण्यात आले. मुख्यत्वेकरून चाचणी लेखा परीक्षा अधिकारी आणि त्यांचा कर्मचारीवृंद, महसूल संकलनाची लेखा परीक्षा आणि जडवस्तु संग्रह, संयंत्र आणि यंत्र ह्यासहित भांडाराची पडताळणी करण्याव्यतिरिक्त गैरव्यवहार शोधून काढणे, खात्यांतर्गत पुस्तके योग्यरित्या ठेवली आहेत की नाही आणि कोणत्याही प्रकारचा अपव्यय होत नाही हे पाहणे ही कर्तव्ये पार पाडीत असत. नंतर चाचणी लेखा परीक्षा अधिकारी ह्यांच्या खात्यामध्ये प्रमुख स्थळ लेखापरिक्षा निरीक्षक, कनिष्ठ स्थळ लेखा परीक्षा निरीक्षक आणि संग्रह पडताळक यांच्या नियुक्त्या झाल्या.

सन 1959 पर्यंत ही व्यवस्था चालू होती. नंतर महानगरपालिकेच्या विविध खात्यांच्या कार्याचा विस्तार झाल्यामुळे चाचणी लेखा परीक्षा कार्यालयाच्या कर्तव्यामध्ये वाढ झाल्याने चाचणी लेखा परीक्षा अधिकारी खाते, प्रमुख लेखापाल खात्यापासून विभक्त करून, सर्वसाधारण विभागास जोडण्याचा आणि महापालिका आयुक्तांच्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा विचार झाला. उपनगरे आणि विस्तारीत उपनगरे ह्यांचे विलिनीकरण झाल्यामुळे कर्तव्यांमध्ये प्रचंड वाढ झाली. ह्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या दिनांक 17.03.1958 च्या ठराव क्र.2060 अन्वये चाचणी लेखा परीक्षा अधिकारी ह्या पदाच्या अर्हता सुधारण्यात आल्या. अर्हता सुधारण्यात आल्यानंतर, चाचणी लेखापरिक्षा अधिकारी ह्यांचे खाते, प्रमुख लेखापाल ह्यांच्या खात्यापासून दि.17.10.1958 पासून विभक्त करण्यात आले आणि महानगरपालिकेच्या दि.03.12.1959 च्या ठराव क्र.1135 अन्वये महानगरपालिका आयुक्तांच्या नियंत्रणाखालील एक स्वतंत्र खाते म्हणून ओळखले जाऊ लागले. चाचणी लेखा परीक्षा कार्यालय हे ह्या खात्याचे नांव त्यावेळी सदर खाते पार पाडीत असलेल्या कार्यांना यथार्थ नव्हते. म्हणून, महानगरपालिका आयुक्तांनी महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेच्या दिनांक 24.03.1960 च्या ठराव क्र.2109 अन्वये, तत्कालिन चाचणी लेखा परीक्षा अधिकारी म्हणून ज्ञात असलेल्या खात्याचे नाव व त्यातील पदनामे बदलली.

| | जुने नाव | बदललेले नांव |
|---|---|---|
| 1 | चाचणी लेखापरिक्षा अधिकारी ह्यांचे खाते | प्रशासकीय अधिकारी (चौकशी) ह्यांचे खाते |
| 2 | चाचणी लेखापरिक्षा अधिकारी | प्रशासकीय अधिकारी (चौकशी) |
| 3 | प्रमुख स्थळ लेखापरिक्षा निरीक्षक | प्रमुख निरीक्षक (चौकशी) |
| 4 | कनिष्ठ स्थळ लेखापरिक्षा निरीक्षक | निरीक्षक (चौकशी) |
| 5 | संग्रह पडताळक | संग्रह पडताळक |

यावेळेपर्यंत, कार्यभार वाढल्यामुळे, सहायक प्रशासकीय अधिकारी (चौकशी)चे एक पद आणि विशेष अधिकारी (पर्यवेक्षण)चे अन्य एक पद निर्माण करण्यात आले. सफाई खात्याच्या कर्मचाऱ्यांची अचानक तपासणी करण्याकरिता विशेष अधिकारी (पर्यवेक्षण) हे पद निर्माण करण्यात आले, पण ते सन 1960 पासून खंडित करण्यात आले.

किमान वेतन अधिनियम आणि औद्योगिक कलह कायदा ह्यासारखे विविध कामगारविषयक कायदे अस्तित्वात आल्यामुळे कामगारांमध्ये त्यांच्या हक्काविषयीची जागृती निर्माण झाली आणि हे कामगार कायदे नागरी प्रशासनास लागू झाल्यामुळे त्यावेळी शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी अवलंबण्यात येणारी कार्यप्रणाली एकीकडे पूर्णत: कालबाह्य झाली, तर दुसरीकडे चाचणी लेखा परीक्षा अधिकारी ह्यांच्या खात्याच्या संरचनेवेळी कल्पिल्याप्रमाणे विविध खात्यातील गैरव्यवहार, अनियमितता आदि प्रकार लेखापुस्तिकेतील फेरफारांशी मर्यादित न रहाता महानगरपालिकेद्वारे होणाऱ्या सर्व प्रकारच्या कामांच्या व सेवांच्या अंमलबजावणीच्या क्षेत्रात त्याचा शिरकाव झाला.

बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याकरिता, निरीक्षक (चौकशी) ह्यांच्या भरतीची प्रणाली बदलण्यात आली. पूर्वी प्रमुख लेखा विभागातील अर्हताप्राप्त ज्येष्ठ व्यक्तींची चाचणी लेखा परीक्षा अधिकाऱ्यांच्या खात्यामध्ये कनिष्ठ स्थळ लेखा परीक्षा निरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात येत असे. तथापि, खात्याच्या नामांतरानंतर, महानगरपालिकेची खात्यांतर्गत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि

मुख्य लिपिक अथवा तत्सम पदावर तीन वर्षे काम केलेल्या पदवीधर अशा महानगरपालिका कर्मचाऱ्यांमधून निवडपध्दतीने निरीक्षक (चौकशी) पदावर नियुक्ती करण्यात येऊ लागली. तद्वत, धोकादायक प्रकरणे हाताळणाऱ्या चाचणी लेखा परीक्षा अधिकारी ह्यांच्या खात्यातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची दक्षता घेण्याची गरज भासू लागली. त्यांना बंदूक, ती चालविण्याच्या परवान्यासह दिली गेली.

तत्कालिन चाचणी लेखा परीक्षा अधिकारी, श्री.एन. व्ही. नाईक ह्यांची प्रशासकीय अधिकारी (चौकशी) ह्या पदी नेमणूक करण्यात आली आणि नंतर त्यांना महानगरपालिकेच्या दिनांक 15.09.1960 च्या ठराव क्र.838 अन्वये, दि.20.9.1960 पासून प्रमुख लेखापाल म्हणून पदोन्नती देण्यात आल्यानंतर महानगरपालिकेच्या दिनांक 14 ऑगस्ट 1961 च्या ठराव क्र.164 अन्वये श्री.जी. डब्ल्यू. शिवेश्वरकर, (भारतीय पोलीस सेवा) या उप-अधीक्षक दर्जाच्या पोलिस अधिकाऱ्याची प्रशासकीय अधिकारी (चौकशी) ह्या खात्याचे खाते प्रमुख म्हणून प्रशासकीय अधिकारी (चौकशी) ह्या पदावर विशेष कार्य अधिकारी म्हणून प्रतिनियुक्ती करण्यात आली. चौकशीची कार्यपध्दती, पुस्तकाच्या स्वरूपात आणण्यात श्री.जी. डब्ल्यू. शिवेश्वरकर यांचा विशेष सहभाग होता. सन 1963 च्या मध्यावर महानगरपालिकेमध्ये कामगारांचा संपूर्ण संप चालू होता. जरी, कामगारांचा संप शेवटी मिटला तरी, महानगरपालिकेची विविध भांडारे आणि संच मांडण्या ह्यांच्या सुरक्षिततेकरिता उपाययोजना करणे आणि त्यांचे संरक्षण करणे ह्याकरिता स्वतंत्र यंत्रणा असण्याची अनेक दिवसांची भेडसावणारी गरज आता प्रकर्षाने जाणवू लागली. सन 1963 मध्ये मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल या नावाचा विभाग निर्माण करण्यात आला आणि तो प्रशासकीय अधिकारी (चौकशी) खात्यास जोडण्यात आला. मुंबई सुरक्षा दलाचे कामकाज जरी मर्यादीत स्वरूपाचे असले तरी त्याचा आवाका मोठा असल्याने ते दिनांक 01.03.1966 पासून प्रशासकीय अधिकारी (चौकशी) खात्यापासून विभक्त करण्यात आले. काळाची गरज म्हणून, महानगरपालिकेच्या दि.27.11.1972 च्या ठराव क्र.1820 अन्वये सहायक प्रशासकीय अधिकारी (चौकशी) ह्या पदाचे उप-प्रशासकीय अधिकारी (चौकशी) ह्या पदामध्ये रूपांतर करण्यात आले. महापालिका भांडारातील साठे पडताळणीचे काम व महानगरपालिकेच्या संस्था व महानगरपालिका अधिकाऱ्यांची निवासस्थाने ह्यामध्ये दूरध्वनी बसविणे ही चाचणी लेखा परीक्षा अधिकारी ह्यांचे खाते, पूर्वापार करीत असलेली, प्रशासकीय अधिकारी (चौकशी) पार पाडीत असलेल्या कार्याशी काहीही संबंधित नसलेली दोन कामे प्रमुख लेखापालांच्या खात्याकडे व कामगार खात्याकडे अनुक्रमे सन 1977 व सन 1985 मध्ये वर्ग करण्यात आली. गैरव्यवहार / अनियमितता ह्याबाबत इतर तपास ह्याबरोबरच महानगरपालिकेच्या महसूलातील गळती थांबविणे एवढेच नव्हे तर महानगरपालिका निधीचा अनाठायी गैरवापर ह्यास प्रतिबंध घालणे ह्याबाबतचा दक्षता कामगिरीचा भार एवढ्या प्रमाणात वाढला की, प्रशासकीय अधिकारी (चौकशी) ह्यांना सहाय्य करण्यासाठी एका स्वतंत्र अधिकाऱ्याची गरज भासू लागली आणि अतिरिक्त प्रशासकीय अधिकारी (चौकशी) हे पद महानगरपालिकेच्या दि.08.12.1988 च्या ठराव क्र.899 अन्वये निर्माण करण्यात आले. प्रशासकीय अधिकारी (चौकशी) ह्या खात्याने पार पाडावयाच्या कर्तव्यामध्ये महानगरपालिकेच्या महसूलातील गळती शोधून काढणे व त्यास प्रतिबंध घालणे ह्या कामापासून ते महानगरपालिका कर्मचाऱ्यांची अकस्मात गैरहजेरी अशा कामापर्यंत विविधता असल्याने ही कार्ये महानगरपालिकेच्या विविध

खात्यांतील प्रशासकीय अधिकारी ह्यांच्या कामापासून अत्यंत विभिन्न आणि वेगळी असल्यामुळे प्रशासकीय अधिकारी (चौकशी) पार पाडीत असलेल्या कामांशी अनुरूप राहण्याकरिता प्रशासकीय अधिकारी (चौकशी) ह्यांचे व त्यांच्या कर्मचारीवृंदाचे पुनर्नामकरण करणे गरजेचे वाटले. ह्यास्तव, महानगरपालिका आयुक्तांनी दि.14.02.1991 च्या ठराव क्र.1246 अन्वये, महानगरपालिकेच्या संमतीने, प्रशासकीय अधिकारी (चौकशी) ह्यांचे खाते हे नांव बदलून प्रमुख अधिकारी (चौकशी) चे खाते असे बदलण्यात आले आणि प्रशासकीय अधिकारी (चौकशी), अतिरिक्त प्रशासकीय अधिकारी (चौकशी) व उप-प्रशासकीय अधिकारी ह्यांचे अनुक्रमे प्रमुख अधिकारी (चौकशी), अतिरिक्त प्रमुख अधिकारी (चौकशी) [नंतर सह प्रमुख अधिकारी (चौकशी) म्हणून पुनर्नामकरण झाले] आणि उप-प्रमुख अधिकारी (चौकशी) असे पुनर्नामकरण करण्यात आले. तद्नंतर महानगरपालिका आयुक्तांनी दि.16.06.2014 रोजी दिलेल्या संमतीनुसार परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्र.ले. (आस्था-2)/आरजीसेल/5 दि.17.06.2014 अन्वये प्रमुख अधिकारी चौकशी खात्यातील प्रमुख निरिक्षक (चौकशी) व निरिक्षक (चौकशी) ह्यांचे अनुक्रमे सहाय्यक प्रमुख अधिकारी (चौकशी) व अन्वेषण अधिकारी (चौकशी) असे पुनर्नामकरण झाले व सह प्रमुख अधिकारी (चौकशी) हे पद उप प्रमुख अधिकारी (चौकशी) म्हणून गणण्यात येऊ लागले. यासोबत संघटनात्मक आराखडा जोडलेला आहे.

ह्या हस्तपुस्तिकेसोबत जोडलेल्या संघटनात्मक आराखड्यानुसार ह्या खात्याची घडण आहे.

**<u>संस्थेची कार्ये:-</u>**

प्रमुख अधिकारी (चौकशी) ह्यांचे कार्यालय ही एक केंद्रीय संघटना असून ती पुढीलप्रमाणे कार्ये पार पाडते:-

अ) प्राथमिक चौकशी

ब) खात्यांतर्गत चौकशी

## <u>अ) प्राथमिक चौकशी</u>

1) महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचारी ह्यांनी लाच मागण्याची व स्वीकारण्याची प्रकरणे शोधून काढून त्यांचे अन्वेषण करणे.

2) महानगरपालिका निधी आणि मालमत्ता ह्यांच्या अपहाराची प्रकरणे.

3) मुंबई अधिनियमातील तरतूदी आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम आणि कार्यपध्दती ह्यांचा महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचारी ह्यांनी भंग केल्याची प्रकरणे.

4) एकाच बाबीच्या संदर्भात एकापेक्षा जास्त महानगरपालिका खात्यांतील कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली चौकशीअंतर्गत प्रकरणे.

5) महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी आणि अधिकाऱ्यांनी केलेली गैरवर्तणूक आणि इतर अनियमितता आणि अशोभनीय वर्तणूक ह्यांचा समावेश असलेली प्रकरणे.

6) महानगरपालिका आयुक्त, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, संचालक (अ.से.व प्र.) किंवा उप-आयुक्त ह्यांनी विवक्षितपणे संदर्भित केलेली प्रकरणे.

7) इतर खाते प्रमुखांनी केलेल्या प्राथमिक चौकशी प्रकरणांची छाननी करणे आणि त्यांना चौकशी प्रकरणांमध्ये सल्ला देणे.

8) महानगरपालिकेच्या महसूलातील गळतीचा शोध लावणे व ती गळती बंद करण्याकरिता उपाययोजना सुचविणे आणि महानगरपालिकेच्या निधीच्या अपव्ययास प्रतिबंध करणे.

9) लाचलूचपत प्रकरणासंबंधित सर्व कामकाज या खात्यामार्फत करण्यात येते. लाचलूचपत प्रतिबंध विभाग आणि महाराष्ट्र शासन यांच्याशी आवश्यक तो पत्रव्यवहार हया खात्यामार्फत करण्यात येतो. निलंबन, संबंधित कर्मचाऱ्यांच्याविरुध्द विशेष न्यायालय येथे अभियोग दाखल करण्याकरिता मंजुरी आदेशाचा मसूदा तयार करणे व सादर करणे. विशेष न्यायालयातील प्रकरणात साक्ष देण्याकरिता कायदा अधिकारी किंवा मा.महानगरपालिका आयुक्त यांना सहाय्य करणे, दोषसिध्दीच्या प्रकरणात कर्मचाऱ्यांना महानगरपालिका सेवेतून काढून टाकणे/बडतर्फ करणे. दोषमुक्ततेच्या प्रकरणात सक्षम अधिकाऱ्यांचे आदेश घेऊन कर्मचाऱ्यांना महानगरपालिका सेवेत पुन:र्स्थापित करणे इ. यासंबंधी राज्य शासनाच्या धरतीवर उप आयुक्त / अति.आयुक्त / मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या आदेशानुसार धोरण निश्चित करणे.

## ब) खात्यांतर्गत चौकशी

1) ज्या प्रकरणांमध्ये ह्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्या प्रकरणातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्याविरुध्द खात्यांतर्गत चौकशी करणे.

2) इतर खाते प्रमुखांनी केलेल्या खात्यांतर्गत चौकशी प्रकरणांची पडताळणी/तपासणी करणे आणि त्यांना चौकशी प्रकरणांमध्ये सल्ला देणे.

3) खाते प्रमुख / उप आयुक्त / अति.आयुक्त यांना खात्यांतर्गत चौकशी प्रकरणात सहाय्य करणे.

4) अपिल / पुनर्विलोकन अर्ज निकाली काढणे.

5) कामगार न्यायालय / औद्योगिक न्यायालय / उच्च न्यायालय इ. न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे हाताळणे.

**इतर कार्ये** -

1) अन्वेषण अधिकारी (चौकशी) या पदाच्या नियुक्तीकरिता धोरण निश्चित करणे.

२) अन्वेषण अधिकारी (चौकशी), सहा.प्रमुख अधिकारी (चौकशी), उप प्रमुख अधिकारी (चौकशी) आणि प्रमुख अधिकारी (चौकशी) या पदाच्या अर्हता निश्चित करणे.

३) अन्वेषण अधिकारी (चौकशी) या पदावरील नियुक्तीसंदर्भातील प्रस्तावापासून त्यांच्या प्रत्यक्ष नियुक्तीपर्यंतची सर्व कामे करणे.

४) सहा.प्रमुख अधिकारी (चौकशी), उप प्रमुख अधिकारी (चौकशी) आणि प्रमुख अधिकारी (चौकशी)या पदावरील पदोन्तीसंदर्भातील सर्व कामे करणे.

५) या कार्यालयासंबंधित अर्थसंकल्पीय सर्व कामे.

६) पदनिर्मिती, पदे कायम करणे आणि पदे आस्थापना सूचीवर घेणे इ. संबंधित कामे.

७) मुंबई महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती (कालबध्द पदोन्नतीसह), पारपत्र, परदेशगमन, निवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती, राजीनामा इ. प्रकरणात ना-हरकत प्रमाणपत्रे देणे.

८) पुनर्विलोकन समिती - एक व पूनर्विलोकन समिती - दोन संबंधित सर्व कामकाज.

९) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मिळण्याबाबत प्राप्त झालेले अर्ज व अपिल अर्ज निकाली काढणे.

**कर्तव्ये:-**

प्रमुख अधिकारी (चौकशी) खात्यातील अधिकारी / कर्मचारी यांना सोपविण्यात आलेली कर्तव्ये हस्तपुस्तिका क्र.02 मध्ये नमूदीत करण्यात आलेली आहेत.

सही/- दि.१४.०५.२०२०

प्रमुख अधिकारी (चौकशी) प्र.